कार्यालयीन परिपत्रक : ५४

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
दिनांक : २२/०३/२०२४.

विषय : आदर्श आचार संहिता कालावधीमध्ये करावयाची कार्यवाही.

संदर्भ : १) मा. अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र. आआसं-२०२४/प्र.क्र.२२६/निवडणूक/कार्या-३३, दि. १६/०३/२०२४.
२) मा. जिल्हाधिकारी, पुणे तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे पत्र क्र. कावि/२७/२०२४, दि. १९/०३/२०२४.

मा. भारत निवडणूक आयोग, दिल्ली यांचेकडून दि. १६/०३/२०२४ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ जाहीर करण्यात आली आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता भारत निवडणूक आयोगामार्फत आदर्श आचारसंहीतेची मार्गदर्शक सूचना (MCC) निर्गमित करण्यात आल्या असून त्यामधील सूचनांचे पालन करून आदर्श आचारसंहीता भंग होणार नसल्याची दक्षता घेणेबाबत निर्देश देणेत आले आहेत.

सदर निर्देशाचे अनुषंगाने सर्व खाते प्रमुख, विभाग प्रमुख, डेपो मॅनेजर, डिएमई यांना कळविण्यात येते की, आदर्श आचारसंहीता लागू झालेनंतर मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम १९९५ अंतर्गत आपले कार्यक्षेत्रातील पीएमपीएमएलच्या संपत्तीच्या भिंतीवरील लेखन / पोस्टर / पेपर्स / कटआऊट / होर्डींग्स / बॅनर्स / झेंडे तसेच बसेसवरील पक्षाच्या जाहीराती, सार्वजनिक ठिकाणी जसे बस स्थानके, इलेक्ट्रिक / टेलिफोन खांब, पीएमपीएमएलच्या इमारती इ. ठिकाणी लागलेल्या जाहीराती तात्काळ काढून टाकण्यात यावेत. यामध्ये कोठेही आचारसंहीतेचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

आचारसंहीता कालावधीमध्ये मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करणेकरीता अधिनियम १९९५ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ प्रशासन विभागाकडे सादर करावा.

(नितीन नार्वेकर)
सहव्यस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

सोबत : संदर्भांकित पत्रे.

प्रत : आयटी विभाग = महामंडळाचे वेब साईट वर प्रसिध्द् करावे,
आस्थापना, कार्गो एफएल,
सर्व खाते प्रमुख / विभाग प्रमुख,
सर्व डेपो मॅनेजर व डिएमई.